कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्गिका

# मेट्रो-३ च्या भुयारीकरणाचा ३६वा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण

पॅकेज-६ चे १००% भुयारीकरण पूर्ण

मुंबई, फेब्रुवारी १२, २०२१- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) आज सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ (CSMIA-T1) स्थानक हा १.५ किमी इतका लांब ३६वा भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला. या प्रसंगी कोची मेट्रो रेलचे व्यवस्थापकीय संचालक अल्केश शर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तापी-१ आणि तापी-२ या दोन टनेल बोअरिंग मशिन्स (टीबीएम) च्या मदतीने पॅकेज-६ ने एकूण ४.४ किमीचे भुयारीकरण पूर्ण केले आहे.

“आज पॅकेज-६ मधील भुयारीकरण १००% पूर्ण करून मुं.मे.रे.कॉने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या पॅकेजमधील दोन स्थानके आंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनलवर आहेत. या दोन्ही स्थानकांना एअरपोर्ट टर्मिनलशी जोडले जाईल त्यामुळे विमानतळापर्यंत प्रवास करणे प्रवाश्यांना अधिक सोयिस्कर होणार आहे.’’ असे मुं.मे.रे.कॉ चे व्यवस्थापकीय संचालक, श्री रणजीत सिंह देओल यांनी सांगितले.

"हार्ड रॉक तंत्रज्ञानाने सुसज्ज टेराटॅक निर्मित टीबीएम तापी -१ आणि २ द्वारे १५ महिन्यात भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आंतरदेशीय विमानतळ (CSMIA-T1) स्थानकाचे जवळपास ७६.४% बांधकाम पूर्ण झाले आहे", असे मुं.मे.रे.कॉ चे संचालक (प्रकल्प), श्री एस. के. गुप्ता म्हणाले.

पॅकेज-६ अंतर्गत आंतरदेशील विमानतळ (CSMIA-T1), आंतरराष्ट्रीय विमानतळ (CSMIA-T2) आणि सहार रोड मेट्रो स्थानकांचा समावेश असून या पॅकेजमध्ये खालीलप्रमाणे ४ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. आंतरराष्ट्रीय विमानतळ (CSMIA-T2), ते सहार रोड (अपलाईन - ६८७ मीटर आणि डाउनलाईन - ६९२ मी), (सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ (CSMIA-T1), (अपलाईन - १५१५ मीटर आणि डाउनलाईन - १५१२ मीटर)

मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५०.३ किमी (९३%) भुयारीकरण पूर्ण झाले आहे. (समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com